# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १२ सप्टेंबर, २०२०

जळगाव दि. १२ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या (बॅकलॉगसह) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अनुषंगाने विकल्प अर्ज भरण्यासाठी एम.के.सी.एल. द्वारे विकसित DU Portal वरील ई-सुविधा अकाऊंट मध्ये विकल्प पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

१ ऑक्टोबर पासून अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या (बॅकलॉगसह) विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा होणार आहेत. ऑनलाईन व ऑफलाईन या दोन पध्दतीने आयोजित करण्यात येत असल्याबाबत व कला,विज्ञान व वाणिज्य आणि समाजकार्य या अंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा या विद्यार्थी कोणत्या माध्यमातून देणार आहे याची माहिती १२ सप्टेंबर पर्यंत महाविद्यालयांनी एक्सेल फॉर्मेटमध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि महाविद्यालयांनी मुदत वाढवून द्यावी व विद्यार्थ्यांकडून माहिती संकलीत करण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे विद्यापीठाने एम.के.सी.एल. द्वारे विकसित DU Portal (विद्यापीठाच्या http://numj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर) विद्यार्थ्यांच्या ई-सुविधा अकांउट मध्ये सदर पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**विकल्प खालील प्रमाणे कळविण्यात येत आहेत.**

१) अभियांत्रिकी व तांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र आणि बहि:स्थ व शिक्षण अध्ययन विभाग प्रवेशित बहि:स्थ अभ्यासक्रमाच्या परीक्षा विद्यार्थ्यांनी फक्त ऑनलाईन पध्दतीनेच देता येणार असल्याने त्यांनी केवळ ऑनलाईन पर्याय निवडावा.

२) कला, विज्ञान व वाणिज्य आणि समाजकार्य या अंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेचा पर्याय उपलब्ध आहे. ऑफलाईन परीक्षेसाठी जवळचे परीक्षा केंद्र निवडण्याची विद्यार्थ्यांना मुभा आहे.

परंतु काही अपवादात्मक परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देणे शक्य नाही त्यांनी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्यांशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांच्या आरोग्यास सर्वोच्च प्राधान्य देऊन सदर विद्यार्थ्यांना परीक्षा ऑनलाईन पध्दतीने देण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मदत केली जाईल.

....२

विकल्प अर्ज भरून देणेसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या http://numj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर जाऊन ई-सुविधा अकाऊंटमध्ये User Name व Password टाकून लॉगिन करावे Willingness to Appear in Exam या Link ला Click करून ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापैकी कोणत्या पध्दतीने परीक्षा देणार आहे. याची माहिती ऑनलाईन सादर करावी. ऑनलाईन विकल्प सादर करतांना त्यात आपला भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आय डी अद्ययावत करावा. तसेच स्क्रीनवर दर्शविण्यात आलेली आपली जन्मतारीख व आईच्या नावाचे स्पेलिंग या माहितीची नोंद आपल्याकडे करून घ्यावी. परीक्षा स्मार्ट फोन / लॅपटॉप / डेस्कटॉप यापैकी कशावर देणार आहेत त्यावर क्लीक करावे. ऑफलाईन विकल्प दिल्यास परीक्षा केंद्राचे नाव येईल ते बदलून जवळचे परीक्षा केंद्र असल्यास यादीतील त्या केंद्रावर क्लीक करावे. पूर्ण विकल्प अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट आपल्याजवळ ठेवावी. अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रिंटआऊट व हॉलतिकीट ऑनलाईन परीक्षेचे वेळेस सोबत ठेवावे. जे विद्यार्थी वरीलप्रमाणे विकल्प सादर करू शकले नाहीत त्यांना ऑनलाईन परीक्षा द्यावयाची आहे गृहीत धरण्यात येईल अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी. पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती

आपला विश्वासू,

**(डॉ. सुनील पाटील)**

जनसंपर्क अधिकारी